PAN No: AAJFK0715B

A Agarwal -

3225 x 2 = 6450/-

TV - 725 3500/-

Rent 3 @ 3500/=

S.A - 3000/-

ebyb
9121209L

13 x 2 = 26 + 34 = 26 x
520

71/9057
Wednesday,August 01 ,2018
11:47 AM

पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 10731 दिनांक: 01/08/2018

गावाचे नाव: कल्याण
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कलन2-9057-2018
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: मे. किर्ती एन्टरप्रायझेस, भागीदारी संस्था तर्फे भागीदार किर्ती किशोर देसाई - -

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 620.00
पृष्ठांची संख्या: 31	
एकूण:	रु. 30620.00

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
11:56 AM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 2

बाजार मुल्य: रु.7253500 /-
मोबदला रु.7253500/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 363500/-

दु. दुय्यम निबंधक वर्ग-२
कल्याण क्र. २

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH004609498201819E दिनांक: 01/08/2018
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.620/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 3107201811520 दिनांक: 01/08/2018
बँकेचे नाव व पत्ता:

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH004609178201819E	BARCODE		Date	31/07/2018-19:35:44	Form ID	25.2

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Sale of Non Judicial Stamps IGR Rest of Maha	**TAX ID (If Any)**	
		PAN No.(If Applicable)	AAJFK0715B
Office Name	KLN2_KALYAN 2 JOINT SUB REGISTRAR	**Full Name**	KIRTI ENTERPRISES
Location	THANE		
Year	2018-2019 One Time	**Flat/Block No.**	SURVEY NO 70 HISSA NO 1
Account Head Details	**Amount In Rs.**	**Premises/Building**	
0030046401 Sale of NonJudicial Stamp	363500.00	**Road/Street**	VILLAGE KALYAN
		Area/Locality	3230 SQ MTRS
		Town/City/District	
		PIN	4 2 1 3 0 1
		Remarks (If Any)	SecondPartyName=KARITA GURUNATH JOSHI AND OTHERS~
Total	3,63,500.00	**Amount In Words**	Three Lakh Sixty Three Thousand Five Hundred Rupees Only

Payment Details	STATE BANK OF INDIA	**FOR USE IN RECEIVING BANK**			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	00040572018073167469	IK00RYJSS9
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	31/07/2018-19:36:52	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		STATE BANK OF INDIA	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Mobile No. : 9821429790

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

दस्त क्र.	२०५६ / २०१८
९	३९

Print Date 31-07-2018 07:36:53

CHALLAN
MTR Form Number-6


GRN	MH004609498201819E	BARCODE		Date	31/07/2018-19:42:24	Form ID	

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Registration Fee Ordinary Collections IGR	**TAX ID (If Any)**	
		PAN No.(If Applicable)	AAJFK0715B
Office Name	KLN2_KALYAN 2 JOINT SUB REGISTRAR	**Full Name**	KIRTI ENTERPRISES
Location	THANE		
Year	2018-2019 One Time	**Flat/Block No.**	SURVEY NO 70 HISSA NO 1
Account Head Details	**Amount In Rs.**	**Premises/Building**	
0030063301 Amount of Tax	30000.00	**Road/Street**	VILLAGE KALYAN
		Area/Locality	3230 SQ MTRS
		Town/City/District	
		PIN	4 2 1 3 0 1
		Remarks (If Any)	
		SecondPartyName=SARITA GURUNATH JOSHI AND OTHERS~	
Total	30,000.00	**Amount In Words**	Thirty Thousand Rupees Only

Payment Details	STATE BANK OF INDIA	**FOR USE IN RECEIVING BANK**			
	Cheque-DD Details	Bank CIN	Ref. No.	00040572018073167368	IK00RYKAA7
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	31/07/2018-19:43:33	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		STATE BANK OF INDIA	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Mobile No. : 9821429790


NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागू आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागू नाही.



Print Date 31-07-2018 07:44:39

Department of Stamp & Registration, Maharashtra			
Receipt of Document Handling Charges			
PRN	3107201811520	**Date**	31/07/2018
Received from KIRIT ENTERPRISES , Mobile number 9821429790, an amount of Rs.620/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 2 of the District Thane.			
Payment Details			
Bank Name	SBIN	**Date**	31/07/2018
Bank CIN	10004152018073109806	**REF No.**	IGAEBPMBO4
This is computer generated receipt, hence no signature is required.			





महाराष्ट्र शासन - नोंदणी व मुद्रांक विभाग

मुल्यांकन अहवाल सन २०१८ -२०१९

१. दस्ताचा प्रकार : विकास करार अनुच्छेद कमांक : ५१

२. सादरकर्त्याचे नाव : ~~कल्याण~~ डिसी ४८५५२५८८ लेटे मार्गदर्शक

३. तालुका : कल्याण.

४. गावाचे नाव : कोळसेवाडी

५. नगरमुमापन कमांक /सर्वे क्र./ अंतिम कमांक. ५०

६. मुल्य दरविभाग (झोन) : ..... उपविभाग .....

७. मिळकतीचा प्रकार : खुली जमीन..... निवासी..... कार्यालय..... दुकान.....औद्योगिक.....

प्रति चौ.मी.दर : ....

८. दस्तात नमुद केलेल्या मिळकती क्षेत्रफळ : ..... कारपेट बिल्टअप चौ.मीटर / फुट

९. कारपार्किंग :..... गच्ची :..... पोटमाळा .....

१०. मजला कमांक :..... उदवाहन सुविधा : आहे / नाही.

११. बांधकाम वर्षे :..... घसारा .....

१२. बांधकाम प्रकार : आर.सी.सी / इतर पक्के / अर्धे पक्के / कच्चे

१३. बाजारमुल्यदर तक्त्यातील मार्गदर्शन सुचना क : ज्याच्ये दिलेली घट / वाढ

१४. लिव्ह ॲन्ड लायसन्सचा दस्त : १. प्रति माह भाडे रक्कम :.....

२. अनामत रक्कम / आगाऊ भाडे : .....

३. कालावधी :.....

१५. निर्धारित केलेले बाजारमुल्य : .....

१६. दस्तामध्ये दर्शविलेला मोबदला : ५२५३५००

३२२५ चौ.फुट बांधकाम ~~३००.६~~ २९९.६ मिल्स × २५२०० = ५२५३५००

१७. देय मुद्रांक शुल्क :..... भरलेले मुद्रांक शुल्क :.....

१८. देय नोंदणी फी :.....

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR सह दुय्यम निबंधक कल्याण-२ यांची मुद्रा कल्याण-3 KALYAN-2

लिपीक

सह दुय्यम निबंधक

लिहुन देणार यांच्या दि.२२५ चे अधिमान्य फोटो ४२६४/०८ विकास करारच्या अनुषंगाने.



THE SEAL OF THE SUB-REGISTRAR
मुख्य निबंधक कल्याण-३ यांची मुद्रा
KALYAN-2
कल्याण-३

विकास अधिकार सुपुर्दगी—करारनामा

हा विकसीत करारनामा कल्याण येथे आज दिनांक ...०१... माहे ऑगस्ट ..... सन २०१८ रोजी मौजे कल्याण जिल्हा ठाणे येथील सर्व्हे क्र. ७० हिस्सा क्र. १ क्षेत्रफळ — ३२३० चौ. मी. पैकी लिहून देणार यांचा अविभक्त हिश्याचा करारनामा लिहून दिला व घेतला तो येणे प्रमाणे :—

क.ल.न.२	
दस्त क्र. १०५७	२०१८
५	39

K.G. JOSHI
ROSHI JOSHI

मे. किर्ती एन्टरप्रायझेस, भागीदारी संस्था,) लिहून घेणार
संस्थेचा पत्ता : वास्तुकीर्ती बंगला, फ्लॉअर व्हॅली) विकासक
खडकपाडा, कल्याण (प), जिल्हा ठाणे)
तर्फे भागीदार,)
१. सौ. किर्ती किशोर देसाई, वय ५४ वर्षे,)
२. श्री कौस्तुभ किशोर देसाई, वय ३० वर्षे,)
३. श्री कल्पेश किशोर देसाई, वय २८ वर्षे,) प्रथम पक्षीय

(करारात यापुढे त्यांना प्रथम पक्षीय/लिहून घेणार/विकासक असा उल्लेख केला असून त्यात त्याचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

यांस .....

१) श्रीमती सरीता गुरूनाथ जोशी,) लिहून देणार
वय ५२ वर्षे धंदा – गृहीणी,) मालक
२) कुमार कुनाल गुरूनाथ जोशी,)
उर्फ कमलाकर गुरूनाथ जोशी)
वय २५ वर्षे धंदा – व्यवसाय,)
३) कुमार ऋषीकेश गुरूनाथ जोशी,)
वय २१ वर्षे धंदा – गृहीणी,)
४) कुमारी रोशनी गुरूनाथ जोशी,)
वय २३ वर्षे धंदा – व्यवसाय,)
५) कुमारी निशा गुरूनाथ जोशी,)
वय २८ वर्षे धंदा – गृहीणी,)
अ. क्र. १ ते ५ आज रोजी रा : मौजे कल्याण)
तालुका कल्याण, जिल्हा ठाणे) द्वितीय पक्षीय

(करारात यापुढे त्यांना द्वितीय पक्षीय/लिहून देणार/मालक असा उल्लेख केला असून त्यात त्याचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

कारणे करार करण्यात येतो तो येणे प्रमाणे :–

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, **मौजे कल्याण** येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे–आर–प्रति)	क्षेत्र (चौरस मीटर्स)
७०	१	०–२९–३ पोट खराबा ०–०३–०	३२३०

दस्त क्र. ९०५७ | २०१८
९ | ३१

ROSHI JOSHI
K.G. JOSHI

अशी मिळकत लिहून देणार व श्री रामदास गणपत जोशी व इतर यांच्या समाईक मालकीची आहे व अशा जमीनीच्या मिळकतीस यापुढे **"सदरहू संपुर्ण मिळकत"** म्हणून करण्यात आलेला आहे. सदरहू संपुर्ण मिळकतीत लिहून देणार यांचा समाईक अविभक्त हिस्सा व अविभक्त मालकी हक्क हिंतसंबंध व अधिकार आहे व सदरहू संपुर्ण मिळकतीतील लिहून देणार यांच्या अविभक्त हिश्यास व अविभक्त मालकी हक्क हिंतसंबंध व अधिकार यांस यापुढे **"सदरहू मिळकत"** म्हणून संबोधण्यात आले आहे व सदरहू मिळकत ही प्रस्तुत कराराचा विषय आहे.

सदरहू संपुर्ण मिळकत लिहून देणार व श्री रामदास गणपत जोशी व इतर यांचे पुर्वगामी हकदार श्री गणपत राघो जोशी यांनी रावळगाव शुगर फार्म लिमिटेड यांच्याकडुन दि. २१.१२.१९५९ रोजी कायम विकत घेतल्याने सदर गणपत राघो जोशी यांचे नाव दि. २८.०३.१९६० रोजीच्या फेरफार क्र. १२८४ अन्वये महसुल अधिकार अभिलेखात व मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास दाखल झाले आहे.

सदर गणपत राघो जोशी हे दि. १६.०८.१९८८ रोजी मयत झाले असुन त्यांचे पश्चात त्यांचे वारस म्हणुन


१. राईबाई गणपत जोशी (पत्नी)
२. जाईबाई गणपत जोशी (दुसरी पत्नी)
३. रामदास गणपत जोशी (मुलगा)
४. लक्ष्मण गणपत जोशी (मुलगा)
५. लहू गणपत जोशी (मुलगा)
६. गुरुनाथ गणपत जोशी (मुलगा)
७. भगवान गणपत जोशी (मुलगा)
८. सुरेश गणपत जोशी (मुलगा)
९. इंदुमती गणपत जोशी (मुलगी)
१०. शकुन तुकाराम पाटील (मुलगी)
११. भागाबाई चंद्रकांत ठाकरे (मुलगी)
१२. मुंगाबाई बाबु वायले (मुलगी)
१३. ताईबाई विष्णू गायकर (मुलगी)



यांची नावे दि. ०७.१०.१९८९ रोजीच्या फेरफार क्र. २०७६ अन्वये महसुल अधिकार अभिलेखात व मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास दाखल झाली आहेत.

वरील वारसांपैकी गुरुनाथ गणपत जोशी हे दि. २३.०८.२०१५ रोजी मयत झाले असुन त्यांचे वारस म्हणुन

१. सरीता गुरुनाथ जोशी (पत्नी)
२. निशा गुरुनाथ जोशी (मुलगी)
३. कुनाल गुरुनाथ जोशी (मुलगा)
४. रोशनी गुरुनाथ जोशी (मुलगी)



R.G. JOSHI

RUSHI JOSHI

५. ऋषीकेश गुरुनाथ जोशी (मुलगा)
यांची नावे दि. २३.११.२००५ रोजीच्या फेरफार क्र. ३४६७ अन्वये महसुल अधिकार अभिलेखात व मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास दाखल झाली आहेत.

गणपत राघो जोशी यांची एक पत्नी श्रीमती राईवाई गणपत जोशी ही दि. १३.११. १९९३ रोजी तसेच दुसरी पत्नी श्रीमती जाईबाई गणपत जोशी ही दि. १७.०३. २००१ रोजी मयत झाली आहे व त्याची नावे दि. १७.०१.२००६ रोजीच्या फेरफार क्र. ३४७४ अन्वये कमी करण्यात आली आहेत.

सदरहू संपुर्ण मिळकत श्री रामदास गणपत जोशी व इतर यांनी दि.२६.०५.२००८ रोजीच्या विकसीत करारन्वये लिहून घेणार – मे. किर्ती एन्टरप्रायझेस, भागीदारी संस्था, संस्थेचा पत्ता : वास्तुकीर्ती बंगला, फ्लॉअर व्हॅली, खडकपाडा, कल्याण (प), जिल्हा ठाणे यांस सदर करारात नमुद अटी, शर्ती व मोबदल्यात विकसीत करण्याकरीता दिली आहे. सदर करार मे. दुय्यम निबंधक कल्याण यांच्या कार्यालयात दिनांक २६.०५.२००८ रोजी दस्त अ. क्र. ४२६४/२००८ अन्वये नोंदवीण्यात आला आहे व कराराच्या अनुषंगाने लिहून दिलेले दिनांक २६.०५. २००८ रोजीचे कुलमुखत्यापत्र मे. दुय्यम निबंधक कल्याण यांच्या कार्यालयात दिनांक २६.०५.२००८ रोजी दस्त अ.क्र.२५८/२००८ अन्वये अधिप्रमाणीत करण्यात आले आहे व वरील करार व त्याअनुषंगाने दिलेले कुलमुखत्यारपत्रे आजही अस्तित्वात असुन संबंधीत पक्षकारांवर बंधनकारक आहेत. परंतु सदर करारात लिहून देणार हे समाईक मालक या नात्याने सामील झाले नव्हते.

मिळकतीत झालेल्या घडामोडी व घटनांच्या अनुषंगाने लिहून देणार व लिहून घेणार यांचे आपसांत झालेल्या समझोत्या अंतर्गत सदरहू संपुर्ण मिळकतीतील लिहून देणार यांच्या अविभक्त हिश्श्याची मिळकत भावी खरेदीदार/विकासक या नात्याने लिहून घेणार यांना देऊन त्यांना सदरहू संपुर्ण मिळकत योग्य रित्या विकसित करण्यास [illegible] अनुषंगाने लिहून देणार यांनी आपल्या हिश्श्याप्रमाणे व कुटूंबाच्या उदरनिर्वाहाकरीता मोबदला लिहून घेणार यांच्याकडुन स्विकारण्याचे ठरविले.

वर [illegible] केलेल्या [illegible] लिहून देणार यांनी सदरहू संपुर्ण मिळकती पैकी त्यांच्या अविभक्त हिश्श्याची अविभक्त मालकी मिळकत म्हणजेच सदरहू मिळकत ही विकासकर्ता बाबतचे सर्व हक्क हितसंबंध व अधिकारा सह लिहून घेणार यांस विकसीत करण्याकरीता देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्याकरीता लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना वास्तुस्वरूपी मोबदला म्हणून सदरहू संपुर्ण मिळकत व/वा सदरहू मिळकती वर विकसती होणाऱ्या इमारतीत ३२२५ चौरस फुट बांधकाम क्षेत्र सदनिका व दोन गाळयाच्या स्वरूपात देण्याचा प्रस्ताव दिला आहे.

सदर मिळकती संदर्भात वरील सर्व वस्तुस्थीती लक्षात घेता सदरहू लिहून घेणार यांनी देऊ केलेला मोबदला हा बाजारभावाप्रमाणे योग्य व रास्त असल्याची खात्री लिहून देणार यांची झाल्यामुळे लिहून देणार यांनी यांनी सदरहू संपुर्ण मिळकती पैकी त्यांच्या अविभक्त हिश्श्याची व अविभक्त मालकी मिळकत म्हणजेच सदरहू मिळकत

दस्त क्र.	१०१८
L	39

R. G. JOSHI

RUSHI JOSHI

ही लिहून घेणार यांस विकसीत करण्यास देण्याचे मान्य व कबुल केले असुन लिहून घेणार यांना सदरहू मिळकत सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत प्राप्त होण्याकरीता जरुर ते सहकार्य देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

उभय पक्षांत ठरलेल्या व्यवहाराची कागदोपत्री नोंद रहावी म्हणुन सदरचा करार उभय पक्षी करीत आहेत तो येणेप्रमाणे :—

१. तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, **मौजे कल्याण** येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे—आर—प्रति)	क्षेत्र (चौरस मीटर्स)
७०	१	०—२९—३ पोट खराबा ०—०३—०	३२३०

सदरहू संपुर्ण मिळकतीतील लिहून देणार यांच्या अविभक्त हिश्यास व अविभक्त मालकी हक्क हितसंबंध व अधिकार यांस यापुढे **"सदरहू मिळकत"** म्हणून संबोधण्यात आले आहे व सदरहू मिळकत ही प्रस्तुत कराराचा विषय असुन लिहून देणार यांनी सदरहू मिळकत ही विकासकार्या बाबतच्या सर्व हक्क हितसंबंध व अधिकारा सह मिळकत जशी आहे तशी लिहून घेणार यांना विकसीत करण्याकरीता देण्याची मान्य व कबुल केली आहे व लिहून घेणार यांना सदरहू मिळकत सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत प्राप्त होण्याकरीता व विकसीत करण्याकरीता जरुर ते सहकार्य देण्याचे मान्य केले आहे व त्या अनुषंगाने लिहून घेणार यांनी सदरहू मिळकत संपादीत करण्याचे मान्य व कबुल केले असुन सदरहू मिळकत ही लिहून घेणार यांना विकसीत करण्याकरीता देण्याच्या मोबदल्यात लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना वास्तुस्वरूपी मोबदला म्हणून सदरहू संपुर्ण मिळकत व सदरहू मिळकती वर विकसती होणाऱ्या इमारतीत ३२२५ चौरस फुट सेलेबल बांधकाम क्षेत्र सदनिका व दोन गाळयाच्या स्वरूपात देण्याचे मान्य व कबुल केले आहेत व सदर बांधकाम क्षेत्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना ज्या स्वरूपात देण्याचा आहे तो येणे प्रमाणे :—

अ. क्र.	सदनिका	क्षेत्र
१.	१ बी. एच. के.	६२५ चौरस फुट
२.	१ बी. एच. के.	६२५ चौरस फुट
३.	१ बी. एच. के.	६२५ चौरस फुट
४.	२ बी. एच. के.	८५० चौरस फुट
५.	१ शॉप	२५० चौरस फुट
६.	१ शॉप	२५० चौरस फुट
	एकणु क्षेत्र	३२२५ चौरस फुट

वर उल्लेख सदनिका व वाणिज्य गाळे विना मोबदला मालकी हक्कावर देण्याचे आहे व तळ मजल्यावरचे व पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR
कल्याण-२
KALYAN-2
दस्त क्र. २०५७ २०१८

R. G. JOSHI
ROSHI JOSHI

मजल्यावरचे उरलेले निवासी गाळे (फलॅट) लिहून देणार यांनी आपल्या मर्जी, खुशी व पसंतीने घेण्याचे आहेत व सदरहू वास्तुस्वरुपी मोबदला हा उभय पक्षांनी सेलेबल बांधकाम क्षेत्रावर आधारीत असावा असे नक्की केले आहे.

२. लिहून घेणार यांनी सदरहू मिळकतीवर आपल्यापदर खर्चाने कल्याण डोंबिवली महानगरपालीका जो नकाशा मंजुर करेल. त्याप्रमाणे नविन इमारत/इमारती बांधुन पुर्ण करण्याची आहे. व ही परवानगी लिहून घेणार यांनी आपल्या खर्चाने लिहून देणार व श्री रामदास गणपत जोशी व इतर यांच्या नावे मिळवीण्याची आहे व आर्किटेककडुन इमारतींचा नकाशा तयार करून घेणेचा आहे. सदरहू मिळकतीचा मोबदला म्हणून लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना नियोजीत इमारतीत वर उल्लेख सदनिका व गाळे विना मोबदला मालकी हक्कावर देण्याचा आहे क्षेत्राचे बांधकाम विना मोबदला पुर्ण पणे सोबत जोडलेल्या नकाश्यात लाल रेषेने दर्शविल्याप्रमाणे बांधुन सर्व प्रथम लिहून देणार यांना देण्याचा आहे व या इमारतीत सर्व उरलेले फलॅटस् लिहून घेणार यांनी आपलया मर्जीप्रमाणे व आपल्या पसंतीच्या खरेदीदारांना आपलया पसंतीच्या किंमतीवर कायम मालकी हक्कावर विकुन त्यांच्याकडुन मोबदलर स्वत: ठेवण्याचा आहे. सदरहू मिळकतीचा मोबदला हा आजचे बाजारभावा प्रमाणे योग्य व वाजवी आहे. व तो उभयपक्षास मान्य व कबुल आहे व त्याबाबत उभयपक्षीयापैकी कोणाचीही कोणतीही तक्रार नाही. लिहून घेणार यांना सदरहू मोबदल्याचे फ्लॅट लिहून देणार यांचे ताबेत देण्याचे दिवशी मिळकतीता फरोक्तखताचा व्यवहारपुर्ण करून लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत सदरहू मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार करतील अगर ते सांगतील त्या इमाच्या, संस्थेच्या, सोसायटीच्या, रोमन्सच्या नावे करून देतील. मात्र त्याकामी होणारा सर्व खर्च, स्टॉप ड्युटी, रजिस्टर चार्जेस लिहून घेणार यांनी करणेचा आहे.

३. सदर मिळकतीचा ताबा दिनांक २६/०५/२००८ रोजीच्या नोंदणीकृत करारान्वये सहाईक खातेदार श्री रामदास गणपत जोशी व इतर यांनी लिहून घेणार यांना दिलेला आहे व तो आजही त्यांच्याचकडे असुन लिहून देणार हे आज लिहून घेणार यांचा कब्जा मान्य व कबुल करीत असुन लिहून देणार हे त्यांचा अभिवक्त हिश्श्याच्या मिळकतीचा ताबा व कब्जा लिहून घेणार यांस आज रोजी कराराच्या अंशिक पुर्ततेकरिता देत आहेत व लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीसह संपुर्ण मिळकतीवर विकसित कार्य राबविण्याचा, पुर्ण करण्याचा व त्या अनुषंगाने मिळकतीवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता, वास्तूशिल्पकार, कायदेशीर सेल्लागार वगैरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्र, आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसीत कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार

THE SEAL OF THE SUB REGISTRAR KALYAN-2

दस्त क्र. २०५

RUSHI JOSHI

K.G. JOSHI

यांनी कोणतीही हरकत घेण्याची नाही तसेच लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीवर त्यांच्या नांवाचा बांधकाम योजना दर्शविणारा नामफलक लावण्याचा हक्क आहे.

४. सदरहू मिळकतीवर नियोजीत नविन इमारतीचे बांधकाम पुर्णत्वाच्या पर्यंतचा सर्व योजना येणारा खर्च लिहून घेणार यांनी करावयाचा आहे व योजने लिहून घेणार (प्रमोटर) व डेव्हलपर्स आहेत.

५. सदरहू नियोजीत इमारतीच्या बांधकामासाठी लागणारा नकाशा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन मंजुर करून घेतल्यानंतर मिळकतीचा खुला, मोकळा व प्रत्यक्ष ताबा प्राप्त झाल्यानंतर सदर इमारतीचे बांधकाम लिहून घेणार यांनी तेव्हा पासुन ४२ बेचाळीस महिन्यामध्ये पुर्ण करून त्यांत वर उल्लेख सदनीका व वाणिज्य गाळा सर्व सुख सूविधा सहित लिहून देणार यांना विना मोबदला देण्याचे आहे.

६. परंतु बांधकाम सुरू करतांना किंवा बांधकाम चालू असताना सदरहू मिळकतीच्या मालकी हक्कावरून तसेच नौसर्गिक आपत्ती, युध्द, बांधकाम सामुग्रीची टंचाई या सरकारी धोरण, अशा कारणामुळे लिहून घेणार हे बांधकाम करू शक्त नसल्यास अशी टंचाई आडकाठी, मनाई दुर होईपर्यंत लिहून घेणार यांना बांधकामाच्या दिरंगाई बाबत जबाबदार धरले जाणार नाही हे लिहून घेणार यांना मान्य व कबुल असून अशी अडचण, अडथळा इत्यादी दुर होईपर्यंत जवेढा कालावधी सदर बांधकाम पुर्ण करण्यासाठी लिहून देणारे यांना वाढवुन देतील.

७. सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकत वर इमारतीचे बांधकाम करण्यापुर्वी लिहून घेणार यांनी मिळकतीची मोजणी करून हद्दनिश्चित करून घेणेच्या आहेत व त्याचा खर्च लिहून घेणार यांनी करावयाचा आहे. सदरहू मिळकतच्या मोजणी करीता लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना संपुर्ण सहकार्या करण्याचे आहेत.

८. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदरहू मिळकत डेव्हलप करण्याबाबत रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र लिहून घेणार यांना लिहून दिले आहे. त्यांच्याबरोबर लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकती संबंधी सर्व कागदपत्र दिले आहेत.

९. सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकत विकसीत होणाऱ्या नियोजीत इमारतीत लिहून घेणार यांना देऊ केलेली दुकाने अगर निवासी गाळे लिहून घेणार यांनी आपल्या पसंती व मर्जीप्रमाणे मालकी हक्कावर विकुन त्याचा मोबदला लिहून घेणार यांनी घेणेचा आहे. अगर ते भाड्याच्या वापरासाठी ठेवण्याचे आहेत. परंतु इमारतीच्या टेरेसचा वापर सर्व गाळेधारकांनी समाईकरीते करण्याचा आहे.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR KALYAN-2

दस्त क्र. ९०५६ / २०१८

ROSHI JOSHI
K.G. JOSHI


१०. लिहून घेणार यांनी सदरहू नियोजीत नविन इमारतीतील लिहून देणार यांना वास्तुस्वरुपी मोबदल्या अंतर्गत प्राप्त होणारे फ्लॉट व शॉप दिल्यानंतर लिहून देणार यांची सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीशी व उरलेल्या इतर फ्लॅट व गाळयांशी काही एक संबध राहणार नाही. सोबत जोडलेल्या नकाशांत दर्शविलेले फ्लॉट व शॉप यांचे एकुण क्षेत्र वगळाता इतर फ्लॉट व शॉप च्या विक्री बाब्तचे व्यवहारात लिहून देणार हस्तक्षेप व अडथळा निर्माण करणार नाहीत. लिहून घेणार यांनी मालकी हक्कावर विक्री केलेल्या फ्लॉट व शॉपच्या रक्कमेवर व ती स्विकारणावर तसेच त्यांच्या विनियोगावर लिहून देणार यांचा कुठलाही अधिकार राहणार नाही.

११. सदरहू मिळकतीचा प्लॉन मंजुर करण्यासाठी जी रक्कम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भरावयाची आहे. ती रक्कम लिहून देणार यांचे नावे लिहून घेणार यांनी भरण्याची आहे व सदरहू रक्कम सुध्दा लिहून घेणार यांनीच परत घेण्याची आहे. सदरची अनामत रक्कम लिहून घेणार यांनी परत मिळण्यासाठी लिहून देणार यांनी संपुर्ण सहकार्य करण्याचे आहेत.

१२. सदरहू करारानंतर सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकती बाबत लिहून देणार यांनी कोणत्याही प्रकारचा व्यवहार दुसरे कोणासही करावयाचा नाही व सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबबत आजचे परिस्थितीत बदल होईल अगर तीवर नविन चार्ज, संबंध, हक्क निर्माण होईल अगर लिहून घेणार यांचेवर नविन जबाबदारी पडेल असे कोणत्याही प्रकारचे व्यवहार लिहून देणार यांनी करावयाचे नाहीत परंतु भविष्यात सदरहू मिळकत विकसीत करण्याकरीता लिहून घेणार यांनी त्यांच्या भागीदारी संस्थेत इतर कोणास ही भागीदार म्हणून घेतल्यास व त्या अनुषंगाने मिळकतीवर बांधकामकार्य राबविल्यास लिहून देणार यांची कोणतीही हरकत असणार



सदरहू नियोजीत नविन इमारत लिहून घेणार यांनी सदरहू मिळकतीचा ताबा मिळाल्यापासुन ४२ (बेचाळीस) महिन्यांचे मुदतीत अगर तत्पुर्वी योग्य प्रकारे पुर्ण करून त्यात लिहून देणार यांना त्यांच्या फ्लॉटचा ताबा सर्व प्रथम देण्याचा आहे. परंतु त्या अडचणीचे निवारण करणे लिहून घेणार यांचे स्वत:चे नियंत्रणाचे बाहेर आहेत. अशा अन्-पेक्षीत अडचणी आल्यास व त्यामुळे इमारीतचे बांधकाम मुदतीत पुर्ण करणे शक्य होणार नसेल तर इमारतीचे बांधकाम मुदतीत पुर्ण करणे शक्य होणार नसेल तर इमारतीचे बांधकम करणेची मुदत उभय पक्षीचे परस्पर संमतीने व एक विचाराने वाढवायची आहे. मात्र त्याला दोन्ही पक्षांची पुर्ण संमती असली पाहिजे व त्याप्रमाणे ठरलेल मुदतीत लिहून घेणार यांना बांधकाम पुर्ण करणेचे आहे.



१३. सदरहू मिळकतीवर व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीवर नियमानुसार मिळणारे सर्व एफ.एस.आय. तसेच सदरहू मिळकतीबाबतचे व/वा सदरहू संपुर्ण

ROSHI JOSHI
K G JOSHI

मिळकतीबाबतचे व अन्ये कोणत्याही मिळकतीचे वापरता येणारे हस्तांतरणीय विकास हक्क (टि.डी.आर), जादा एफ.एस.आय., टेनेंट एफ.एस.आय., स्टेअरकेस एफएसआय, प्रिमियम पेड एफएसआय, आणि अथवा शासनाने इतर वाढीव ग्राह्य केलेला एफएसआय प्राप्त करुन सदरहू मिळकतींवर व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीवर वापरण्याचे हक्क लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी दिलेले आहेत व त्यापासुन होणाऱ्या बांधकामा मध्ये लिहून देणार यांचा कोणताही हक्क व हितसंबंध असणार नाही तसेच सदरहू बांधकाम खुल्याबाजारात विकण्याचे हक्क देखील लिहून घेणार यांना आहेत व विक्रीपासुन येणारा मोबदला देखिल लिहून घेणार यांनी स्वत:च्या फायदयाकरीता ठेवण्याचा आहे व विनियोग करण्याचा आहे, त्यामध्ये लिहून देणार यांचा कोणताही हक्क व हितसंबंध असणार नाही, तसेच सदरहू होणाऱ्या वाढीव बांधकामामध्ये लिहून देणार यांना कोणताही मोबदला देय असणार नाही.

१५. सदरहू मिळकत व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीचा काही भाग हा टिकासफ आराखडया अंतर्गत बाधीत आहे असे आढळल्यास असा भाग संबंधीत सरकारी अथवा निमसरकारी कार्यालयास हस्तांतरीत करण्यासाठी हस्तांतरणीय विकसीत हक्क अथवा इतर फायदे हे लिहून घेणार यांना स्वत:च्या फायद्याकरीता घेण्याचे हक्क व अधिकार लिहून घेणार यांना आहेत तसेच त्या बाबत करावी लागणारी कार्यवाही त्या अनुषंगाने करार मदार, लेखटेक, कायम फरोक्तखत, इंडेम्नीटी बॉन्ड लिहून देण्याचे सर्व हक्क व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस या करारा अंतर्गत दिले आहेत तसेच असा हस्तांतरणीय विकसीत हक्क लिहून घेणार सदरहू मिळकीतवर व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीवर, इतर मिळकतीवर वापरण्याचे पुर्ण हक्क व अधिकार आहेत व असा वापरता न आल्यास हस्तांतरणीय विकसीत हक्क लिहून घेणार यांना योग्य वाटेल त्या किंमतीला योग्य वाटेल त्या अटी, शर्ती व तरतुदींवर विकण्याचा अधिकार आहे व त्यात लिहून देणार कुठल्याही प्रकारची ढवळाढवळ करणार नाहीत किंवा कुठलीही हरकत उपस्थित करणार नाहीत तसेच सदर हस्तांतरणीय विकसीत हक्क वापरापासुन/विक्री पासून येणारा मोबदला/फायदा हा सुध्दा लिहून घेणार यांनी स्वत:च्या फायद्याकरीता वापरण्याचा/ठेवण्याचा आहे व अशा मोबदल्यामध्ये लिहून देणार यांचा कुठलाही हक्क, हिस्सा हितसंबंध असणार नाही. तसेच हस्तांतरणीय विकसीत हक्क खरेदीदारांबरोबर जो करार करावा लागेल तो लिहून घेणार यांनी स्वत:च्या नावाने करावील व त्या करीता लिहून देणार यांच्या सहया असणार नाहीत. परंतू काही कारणास्तव जरुर पडल्यास तशा सहया लिहून देणार हे वेळोवळी देतील परंतू अशा करारातील तरतुदींच्या पूर्ततेची जिम्मेदारी लिहून घेणार यांचीच राहील.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR
KALYAN-2
दस्त क्रमांक २ यांची साक्ष
कल्याण-२

दु.नि.सह.दु.नि. कल्याण नं. २
दस्त क्रमांक २०१८
93 39

ROSHI JOSHI

K.G. JOSHI

१६. प्रस्तुत करार झाल्यानंतर सुध्दा लिहून देणार गरज भासल्यास जरूर ते कागदपत्र/दस्तऐवज, माहिती, तत्सम लेख–टेक लिहून घेणार अथवा त्यांचे कायदेशीर सल्लागार यांस पुरवतील व मिळकतीच्या खुलाशासाठी जरूर ते सविस्तर निवेदन अथवा लेखी करार–मदार, सत्यप्रतिज्ञालेख अथवा इतर कागदपत्रे करून देतील.

१७. सदरहू मिळकत विकसित करण्यास जे जे अर्ज करावे लागतील तसेच ज्या ज्या कागदपत्रांवर, प्रतिज्ञापत्रावर फॉर्मवर, हमीपत्रांवर लिहून देणार मालक यांच्या सहया लागतील त्या त्या सहया लिहून देणार जरूर पडल्यास विनातक्रार समक्ष हजर राहून देतील तसेच लिहून घेणार यांच्या मार्गदर्शनाखाली व लिहून घेणार यांच्या सांगण्यानुसार जरूर त्या ठिकाणी जाबजबाब, कबुली, निवेदन देऊन सहया करतील. लिहून देणार हे अशा प्रकारे जाबजबाब कबूली जबाब वगैरे देण्यास कुठल्याही प्रकरे हयगय, टाळाटाळ, दिरंगाई करणार नाहीत.

१८. वर नमुद केलेली जमीन/सदरहू मिळकत ही लिहून देणार यांचे सामाईक मालकींची असुन त्यांच्या ताबे कब्जांतील आहे व त्यांच्या शिवाय तसेच रामदास गणपत जोशी व इतर यांच्याशिवाय सदरहू मिळकतीशी इतर कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबध नाही अगर या जमीनी लिहून देणार यांनी कोणास गहाण, दान बक्षीस, फरोक्त केलेली नाही. अगर साठेकरार अगर डेव्हलपमेंटचा करार केलेला नाही. त्याच प्रमाणे सदरहू मिळकतीचे टॅक्स, लाईट बिल व इतर देणी लिहून देणार यांनी आज पर्यंत भरली आहेत.

१९. वर नमुद केलेल्या जमीनीबाबत कोणत्याही कोर्टात दावा वगैरे प्रकरण चालु नाही. तसेच प्रमाणे या जमीनीत ॲक्विझिशन अगर रिझर्वेशन नोटीस सरकार तर्फे किंवा निमसरकारी संस्थातर्फे अद्याप लिहून देणार यांना आलेली नाही.

२०. सदरहू मिळकतीवर व/वा सदरहू संपुर्ण मिळकतीवर बांधली जाणारी इमारतीचे बांधकाम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचे नावे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन मंजुर करून त्यावर बांधकाम परवानी घेण्याचा आहे व यापुढे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सर्व सहकार्य देणेचे आहे. मात्र त्यासाठी लागणारा सर्व खर्च लिहून घेणार यांनीच करणेचा आहे.

२१. सदरहू मिळकतीवर निर्माण होणाऱ्या नियोजित इमारतीची सोसायटी अगर असोशिएशन स्थापन झाल्यास लिहून देणार सदरहू सोसायटी अगर असोसिएशनचे सभासद बनतील. आणि त्याकामी त्यांच्या हिश्याला येणारी खर्चाची वर्गणी लिहून देणार देतील. त्याचप्रमाणे सोसायटी अगर असोसिएशनचे नियम अधिनियमचे लिहून देणार पालन करतील.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR KALYAN-2

क.क्र. ९२८
क्र. ८५७ ९२८
१४ | ३१

RUSHI JOSHI

K.G. JOSHI

२२. सदरहू मिळकीवर अस्तित्वात असलेला इमला लिहून घेणार यांनी आपल्या राजीखुशीने व त्यांच्या दरम्यान ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे लिहून देणार यांना दिला आहे. लिहून देणार यांनी सदरहू इमला आपल्या पदर खर्चाने मोडून त्याचा सर्व सामानसुमान स्वत: घेणचा अगर तो इतर कोणासही विकण्याचा आहे. आणि जमीन साफसुफ करून तीचा खुला ताबा कब्जा लिहून घेणार यांना देण्याचा आहे.

२३. सदरहू मिळकतीत लिहून देणार यांचे जे भाडेकरी आहेत त्यांच्या कडुन ताबा घेण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची आहे. लिहून घेणार यांना इमारत बांधण्याकरीता देण्याचा भाडेकरू यांनी ताबा देण्यास नकार दिल्यास आणि त्यांनी नियोजीत नवीन इमारतीत पर्यायी जागा मागितल्यास अशा भाडेकरूंना लिहून घेणार यांनी त्यांना मिळणाऱ्या मोबदल्याच्या क्षेत्रातुन पर्यायी जागा देण्याची आहे.

२४. सदरहू मिळकत ही लगतच्या मिळकतीबरोबर एकत्रित करून अशा एकत्रित मिळकतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन मिळकत विकसीत करण्याच्या दृष्टीने आराखडा मंजूर करून घेण्याचा हक्क लिहून घेणार यांना आहे.

२५. लिहून घेणार व लिहून देणार यांनी इतर कोणत्याही बेकायदेशीर कारणाने हा करारनामा रद्द करणार नाहीत व या करारनाम्याच्या अंमलबजावणीचा हक्क उभयपक्षीयांस राहिल व तसेच हा करारनामा लिहून घेणार लिहून देणार यांचे वालीवारस हक्क हितसंबंध यावर बंधनकारक राहिल.

२६. सदर इमारत बांधुन झाल्यानंतर ६ महिन्याच्या आत किंवा ६ महिन्यापर्यंत इमारतीच्या बांधकामामध्ये कोणत्याही प्रकारचे दुरूस्तीचे काम असतील काम झाल्यास त्यासाठी डागडुजी/दुरूस्ती करण्यासाठी जो काही खर्च येईल तो खर्च लिहून घेणार य यांनी करावयाचा आहे व त्यानंतर आपआपल्या हिश्यातील बांधकामाच्या दुरूस्तीचा खर्च ज्याचा त्याने करावयाचा आहे.

२७. सदरहू मिळकतीवर निर्माण होणाऱ्या नियोजित इमारतीस महाराष्ट्र राज्य विद्युत पारोषण मंडळाचे मिटरचे डिपॉझिट भरणे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडुन पाणीपुरवठा लागणारे डिपॉझिट भरणे इत्यादी व इतर डिपॉझिट भरण्याचा सर्व खर्च लिहून घेणार यांनी करावयाचा आहे.

२८. सदरहू संपुर्ण मिळकतीचा ताबा यापुर्वीच दिनांक २६/०५/२००८ रोजीच्या विकसीत करार करतेवेळस श्री रामदास गणपत जोशी व इतर यांनी लिहून घेणार यांना दिला आहे व आज रोजी सदर मिळकतीचा प्रत्यक्ष मोकळा, खुला व निर्वीवाद ताबे कब्जा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना मिळकत विकसीत करण्याकरीता प्रत्यक्ष दिला आहे व लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचा ताबा घेतला आहे. लिहून देणार असे जाहीर व उद्घोषीत

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR

H.G. JOSHI

ROSHI JOSHI

करतात की, सदरहू करारा नंतर लिहून घेपार हे श्री रामदास गणपत जोशी व इतर सहहिस्सेदार तसेच मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडुन करार, कुलमुखत्यारपत्र, दस्त, व इतर अनुषंगीक लेखटेक करुन घेतील त्यास लिहून देणार यांची पुर्ण संमती व मान्यता आहे व राहील.

२९. सदरहू करार अस्तित्वांत असतांना सदरहू मिळकत विकसीत करण्यांचा सर्व खर्च व इमारत पुर्ण होईपर्यंत सर्व जबाबदाऱ्या अगर नुकसान भरपाईचा मुद्दा उपस्थित झाला तर त्याची सर्वस्वी जबरबदारी लिहून घेणार यांची राहिल.

३०. सदरहू इमारत बांधतांना उत्तम दर्जाचा/क्वॉलीटीचा माल वापरून लिहून घेणार इमारत /इमारती पुर्ण करतील.

३१. मुदत या कराराची महत्वाची अट आहे वर उल्लेखिलेल्या मुदतीत लिहून घेणार यांनी इमारत बांधकाम पुर्ण करून लिहून देणार यांना त्यांचे गाळे व फलॉटसचा ताबा देण्याचा आहे.

३२. लिहून घेणार यांना सदरहु मिळकतीचे परस्पर हक्क कोणासही तबदील करण्याचे तसेच लिहून घेणार यांना सदरहू मिळकत योग्यरित्या विकसित करण्याकरीता त्यांच्या भागीदारी संस्थेत इतर इसमास नविन भागीदार म्हणून सामील करून घेण्याचे हक्क व अधिकार आहेत व रहतील तसेच सदरहू मिळकत इतर व्यक्ती/संस्थेबरोबर जॉइन्ट व्हेन्चर तत्वावर आणि/अथवा अन्य तत्वावर विकसित करण्याचा व त्या अनुषंगाने व्यवहार करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे, त्यांस लिहून देणार यांची हरकत राहणार नाही.

३३. या व्यवहाराबद्दल वरील लिहून देणार यांचे वालीवारस, हक्क हितसंबंध अगर अन्य कोणही दंगदावा सांगु लागल्यास त्याचे निवारण लिहून देणार यांनी आपल्या खर्चाने करून देतील व लिहून घेणार यांचा हक्क खरा करून देण्याचा आहे.

३४. सदरहू करार उभयपक्षीय यांचेवर त्यांचे वालीवारस, हक्क हितसंबधी, ॲडमिनिस्ट्रेटर्स, एक्झीक्युटर्स व असाईन यांचेवर पुर्णपणे बंधनकारक आहे. उभयपक्षीयांचे वरील शर्ती व अटीचे पालन राजी खुशीने करून इमारत बांधुन पुर्ण होईपर्यंत एकमेकांना सहकार्य देणे आहे. लिहून देणार यांनी वरील कामाच्या कुठल्याही अटी शर्तीप्रमाणे भंग केल्यास व लिहून घेणार यांचे कामात अडथळा निर्माण केल्यास त्याप्रसंगी होणाऱ्या खर्चाची व नुकसानची जबाबदारी लिहून देणार यांचेबर राहिल. अगर लिहून घेणारयांना इमारत बांधण्याचे कामा विना करणे विलंब केल्यास लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडुन नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहिल.

३५. नियोजीत नविन इमारत पुर्ण झाल्यास तिचा कंप्लीशन सर्टिफिकेट मिळविण्याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांचेवर राहिल मात्र त्याकामी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सहकार्य देतील.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR KALYAN-2

क. ८४
दस्त क्र. ८०५७
९८ | ३१

K.G. JOSHI

RUSHIJOSH

३६. त्याप्रमाणे सदर भुखंडावर बांधण्यात येणाऱ्या नियोजित इमारतीतील लिहून देणार यांना वास्तुस्वरुपी मोबदल्या अंतर्गत वर उल्लेख केलेल्या सदनिका व वाणिज्य गाळे लिहून घेणार हे लिहून देणार यांना स्वखर्चाने रजिस्ट्रेशन करून त्याचा खुला व शांततामयत कब्जा लिहून देणार यांना देतील.

३७. सबब लिहून घेणार हे लिहून देणार यांना देणार सदनिका व गाळे संदर्भात लिहून घेणार हे लिहून देणार यांच्याकडुन कोणतीही सर्विस चार्ज, वॅट, जी. एस. टी. तसेच जा कोणताही प्रकारचा चार्ज घेणार नाहीत सदरची सदनिका लिहून घेणार हे लिहून देणार यांना स्वबा दक मल तत्वावर इतील.

३८. सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणारे इमारतीचे काम होईपर्यंत लिहून देणार यांनी त्यांच्या राहण्याकरीता पर्यायी सदनिका उपलबध करून घेतील. सबब सदरची सदनिका उपलबध झाल्यास लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना प्रति माह भाडे म्हणून रक्कम रू. ५,०००/— सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण करून ताबा देईपर्यंत देण्याचे आहेत.

३९. लिहून घेणार हे लिहून देणार यांना देणारी सदनिका व गाळे हे भाडेकरू यांना देण्यात येणारे इमारतीत देणार नाहीत. सबब लिहून देणार यांना सदरची सदनिका लिहून घेणार विक्रीसाठी बांधण्यात येणारे बिल्डींग मध्ये देण्याचे लिहून घेणार हे मान्य कबुल आहे.

४०. नियोजीत नविनी इमारत पुर्ण झाल्यास ती इमारत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परवानगीनुसार व मंजुरी झालेल्या प्लॅनप्रमाणे आहे याची तिचे बांधकाम नियमाप्रमाणे आहे. या बद्दलचे सर्टिफिकेट आर्किटेक्चर कडून घेणेची जबाबदारी लिहून घेणार यांची आहे.

